

# इतिहास-नागरिकशास्त्र लेख-4

**राहुल परब, शाळा :** महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पू)

## घटक चाचणी परीक्षा-I नमुना उत्तरपत्रिका

**प्र. 4** (A)

1) केंद्र शासन व राज्य शासन कायदा करू शकतील अशा विषयांचा **समवर्ती** सूचित समावेश होतो.

2) भारताचे **उपराष्ट्रपती** राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.

(B)

1) **उत्तर -**लोकसभेच्या सदस्यत्वाच्या पात्रता अटी पुढीलप्रमाणे आहेत -

i) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

ii) तिचे वय 25 वर्षे पूर्ण असावे.

iii) संसदेने वेळोवेळी प्रतिनिधित्वाविषयी केलेल्या अटींची पूर्तता तिने केलेली असावी.

**उत्तर -** 2) राष्ट्रपतींचे आर्थिक अधिकार पुढीलप्रमाणे आहेत-

i) अर्थविधेयक राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीनेच लोकसभेत सादर केले जाते.

ii) दर पाच वर्षांनी वित्तआयोग नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो.

**उत्तर-** 3)

i) पंतप्रधानांना भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य प्रवक्ते मानले जाते.

ii) परराष्ट्र धोरणासंबंधी पंतप्रधान जे वक्तव्य करतात ते अधिकृत मानले जाते आणि ते गंभीरपणे घेतले जाते.

iii) आंतरराष्ट्रीय राजकारणाशी संबंधित पंतप्रधान जे निर्णय घेतात त्यावर जागतिक राजकारणातील भारताची प्रतिमा तयार होते.

विद्यार्थी मित्रमैत्रिणींनो,

आतापर्यंत आपण इतिहास- नागरिकशास्त्राच्या अभ्यासाचा पहिला टप्पा पार केला. घटक चाचणी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिकेचाही विचार केला. आपण परीक्षेच्या जवळ जात आहोत. काळ पुढे जात आहे. त्यामुळेच नियोजनपूर्वक अभ्यासाची आता गरज आहे. इतिहास-नागरिकशास्त्र या विषयाच्या अभ्यासाला सोमवार ते शनिवार फक्त तीस मिनिटे देणे आवश्यक आहे. प्रत्येक आठवड्याला एक प्रकरण अभ्यासावयाचे आहे.

सोमवारी पाठपुस्तकातील पाठाचे वाचन करायचे. पाष्ठ्यपुस्तकातील पाठाचे प्रथम वाचन करताना इतिहासाच्या धड्यातील मध्यवर्ती कल्पना समजावून घ्यायची. पुन्हा वाचन करताना धड्यातील मुख्य मुद्दे महत्त्वाच्या घटना, व्यक्ती, संस्था, संस्था संघटना अधोरेखित कराव्यात. नागरिक शास्त्रातील विविध शासनसंस्थांचे स्वरूप, रचना, कार्य इत्यादी बाबी समजावून घ्याव्यात.

मंगळवारी पाठातील मुख्य मुद्दे स्वतंत्र कागदावर लिहून काढावेत. उदा. क्रांतियुगातील क्रांती, पार्श्वभूमी, घटना, परिणाम इ. पहिल्या/ दुसऱ्या महायुद्धांची कारणे, घटनाक्रम, परिणाम इ. राष्ट्रसंघ/ संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या स्थापनेमागील पार्श्वभूमी, स्थापना, कार्याचे स्वरूप, कार्याचे मूल्यमापन इत्यादी. तसेच नागरिकशास्त्राच्या विविध शासनसंस्था- जसे लोकसभा- राज्यसभा- महानगरपालिका- नगर परिषद, जिल्हा-परिषद पंचायत समिता- ग्रामपंचायत यांची तुलना करणारे तक्ते तयार करावेत.

अशा प्रकारचे स्वतंत्रपणे तयार केलेले तुलनात्मक तक्ते सतत नजरेसमोर राहतील अशा ठिकाणी लावावेत. इतिहासाचे धडे गोष्टीरूपाने लक्षात ठेवावेत.

बुधवार आणि गुरुवार हे दिवस खास स्वाध्यायातील प्रश्नांसाठी राखून ठेवावेत. प्रथम स्वाध्यायातील, दीर्घोत्तरी प्रश्न तयार करावेत. दीर्घोतरी प्रश्न लिहिताना सर्वप्रथम एक-दोन ओळीत प्रश्नांची प्रस्तावना, त्यानंतर प्रश्नांच्या अनुषंगाने येणारे मुख्य मुद्दे, त्यांचे उपमुद्दे आणि शेवटी एक-दोन ओळींमध्ये समारोप असे असावेत. दीर्घोत्तरी प्रश्न तयार करताना पाठ्यपुस्तकातील मुद्द्यांचा आधार घेऊन शक्यतो स्वत:च्या भाषेमध्ये हे प्रश्न तयार करावेत. दीर्घोत्तरी प्रश्न तयार केल्यानंतर उत्तरातील मुद्दे-उपमुद्दे क्रमाने समजावून घ्यावेत व लक्षात ठेवावेत. पाठांतराची सवय असल्यास प्रथम सर्व मुख्य मुद्दे पाठ करावेत व त्यानंतर प्रश्नातील उपमुद्दे पाठ करावेत. अशा रीतीने दीर्घोत्तरी प्रश्नांची तयारी केल्यावर लघुत्तरी प्रश्नांची तयारीसुद्धा त्याच्या अनुषंगाने होऊ शकते. लक्षात ठेवा की, अशा प्रकारे प्रश्नांची तयारी करताना स्वत:चे की वर्डस् तयार करावेत. उदा. बोस्टन टी पार्टी म्हणजे, चहाच्या पेट्या समुद्रात फेकून दिल्या किंवा शीतयुद्ध म्हणजे अमेरिका व रशिया यांच्यातील तणावपूर्ण संबंध. काही लघुत्तरी प्रश्न हे दीर्घोत्तरी प्रश्न उत्तरातच असतात. जसे पहिल्या महायुद्धाची कारणे पाहताना पहिले महायुद्ध कोणत्या दोन गटांत झाले किंवा पहिल्या महायुद्धाचे तात्कालिक कारण होय. इतर लघुत्तरी प्रश्नांची वेगळी तयारी करू शकता. रिकाम्या जागा भरा या प्रश्नांची तयारी करताना पाठातील महत्त्वाची वाक्ये अधोरेखित करावीत आणि महत्त्वाच्या शब्दांसह ती लिहून काढावीत. जोड्या लावा या प्रश्नाची तयारी करण्यासाठी पाठांतील व्यक्ती, त्यासंबंधी देश-घटना- कार्य तसेच विविध संस्था- संघटनांचे कार्य स्वतंत्र कागदावर लिहून काढावेत.

शुक्रवारी विविध पूरक अध्ययन सामग्रीतील प्रश्न एस.एस.सी. बोर्ड प्रश्नपत्रिका व प्रश्नपेढीतील स्वाध्यायात नसलेले प्रश्न, शिक्षकांनी दिलेले जास्तीचे प्रश्न, गृहपाठ याची तयारी करावी.

शनिवारचा दिवस हा आठवड्यात झालेल्या अभ्यासाच्या उजळणीसाठी राखून ठेवावा. वस्तुनिष्ठ प्रश्नांची उजळणी करावी. लघुत्तरी व दीर्घोत्तरी प्रश्न पुन्हा एकदा वाचावेत. त्यातील मुद्दे, उपमुद्दे, त्यांचा क्रम यांची उजळणी करावी. पाठाची उजळणी करताना पाठातील मुख्य मुद्दे, आशय आपल्या शब्दांत लिहून ठेवायचे. त्यानंतर पाठ न वाचता हे मुद्दे आश्य फक्त वाचून काढायचे, त्यानंतर किती आठवते ते पहायचे. जर का आठवत नसले तर पुन्हा पाहायचे व लक्षात ठेवायचे. असं केल्यास ते व्यवस्थित लक्षात राहील.

रविवारी आठवड्याभरातील तयारी केलेल्या प्रश्नांचा लेखी सराव करावा. प्रश्नांचे लेखन करताना वेळेचे नियोजन करावे. उत्तर लिहिल्यानंतर ते तपासून पाहावे. त्यातील उणिवा, त्रुटी लक्षात घेऊन पुन्हा होणार नाहीत याची काळजी घ्यावी. अशा प्रकारे सोळा पाठांची तयारी केल्यास सोळा आठवड्यात सोळा प्रकरणे अशा प्रमाणात चार महिन्यांत सर्व अभ्यासक्रमाची तयारी होईल आणि उरलेला वेळ प्रश्नपत्रिकांचा लेखन सराव करण्यासाठी वापरता येईल. अर्थात अशा प्रकारे अभ्यास करण्यासाठी प्रयत्नपूर्वक नियोजनाची आणि अभ्यासात सातत्य राखण्याची गरज आहे.

**उद्याचा विषय : भूमिती**

लोकसत्ता यशस्वी भव! दहावी अभ्यास मालिका

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com




यंदाच्या पावसाळ्यात तुमच्या मुलाला
**असुरक्षित** ठेवू नका.

पावसाळ्यामध्ये पाण्यावाटे फैलावणाऱ्या आजारांची जोखीम खूपच वाढते.
ॲक्वागार्ड टोटल द्वारा तुमच्या कुटुंबीयांना जॉंडिस, टायफॉइड
आणि डायरिया सारख्या आजारांपासून संपूर्ण सुरक्षा
मिळत असल्याची खात्री करून घ्या. म्हणूनच 40 लाख माता
केवळ ॲक्वागार्ड टोटल वॉटर प्युरीफिकेशन वर विश्वास ठेवतात.

फ्री होम डेमोसाठी 56006 ला "AG" SMS* करा किंवा फोन: 098210 48777, 3988 3333



TRITON/08/EF/J067

Aquaguard Total™
Total Health. Total Water Purification.

*स्पेशल SMS रेट्स लागू.